जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८०३ दिनांक - ११/११/२०२३**

लोणी काळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## अभिजीत अभिमन्यु आहेरकर (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०४ साथीदार यांचेविरूध्द मकोका कारवाई

फिर्यादी हे दिनांक २५/०९/२०२३ रोजी रात्रौ त्यांचे मित्र सलमान पठाण याचेसह इंदिरानगर चौक, लोणी-काळभोर,ता.हवेली,जि.पुणे या ठिकाणी गप्पा मारत उभे असताना,त्यांचे ओळखीचे इसम प्रथमेश आयरे व प्रणव शिरसाठ यांनी मोटार सायकलवरुन येवुन,फिर्यादीस कट मारला. त्यावेळी फिर्यादी यांनी दोघांना,निट बघुन गाडी चालविता येत नाही का असे बोलण्याचा प्रथमेश आयरे याला राग येवुन,थांब तुला बघतोच असे म्हणून निघून जावुन,थोडया वेळाने दोन मोटार सायकलींवर प्रथमेश आयरे, प्रणव शिरसाट याचेसोबत अभिजीत आहेरकर, अभिषेक रामुपुरे यांनी येवुन,अभिजीत आहेरकर याने त्याचे हातात लोखंडी कोयता तसेच अभिषेक रामपुरे याचे हातात लोखंडी रॉड तसेच प्रथमेश आयरे व प्रणव शिरसाठ हे देखील हातात कोयते घेवुन,फिर्यादी यांचे जवळ येवुन,आम्ही लोणी गावचे बाप आहोत,आता तुमची विकेट टाकतो असे म्हणुन प्रथमेश आयरे याने फिर्यादीस जीवे मारण्याचे उद्देशाने त्यांचे डावे कानावर वार करून, प्रणव शिरसाठ याने सलमान पठाण याचे डाव्या हातावर कोयत्याचा वार केला. त्यामुळे फिर्यादी व त्यांचे मित्र घाबरून जीव वाचविण्याचे उद्देशाने तेथुन पळून जात असतांना,सदर इसमांनी आराडा-ओरडा करून तुम्हाला जिवंत सोडणार नाही असे बोलून,फिर्यादी यांचे पाठीमागे कोयते घेवून पाठीमागे येवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. म्हणून फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन **लोणी-काळभोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.६०३/२०२३,भा.दं.वि.क.३०७,३२६,५०४,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),सह महाराष्ट्र पोलीस अधि.१९५१ चे कलम ३७(१)(३),क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ३,७** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान आरोपी नामे १)अभिजीत अभिमन्यु आहेरकर,वय २२ वर्षे,रा. लोणी काळभोर,ता.हवेली,जि.पुणे (टोळी प्रमुख) २)अभिषेक दत्तात्रय रामपुरे,वय २० वर्षे,रा.आल्हाट चाळ,कदमवाक वस्ती,ता.हवेली,जि.पुणे ३)प्रथमेश गणेश आयरे,वय-१९ वर्षे,रा.सिद्राममळा,लोणी-काळ भोर,ता.हवेली,जि.पुणे यांना अटक करण्यात आली असून,१)प्रणव भारत शिरसाठ २)गौरव गोपीचंद बडदे हे पाहिजे आरोपी आहेत.**

नमुद आरोपी १)अभिजीत अभिमन्यु आहेरकर (टोळी प्रमुख) याने व इतर साथीदारांसह स्वतःचे अधिपत्याखाली संघटीत गुन्हेगारी टोळी निर्माण केलेली असुन सदर गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व काशिनाथ पाटीलनगर,बालाजीनगर,धनकवडी या परिसरामध्ये प्रस्थपित व्हावे,दहशत निर्माण व्हावी यासाठी त्यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व आर्थिक फायदयासाठी,सदर टोळीच्या मार्फतीने लोणी-काळभोर गाव व आजु-बाजुचे परिसरात अग्निशस्त्राचा व धारदार शस्त्राचा वापर करुन दहशत निर्माण केलेली आहे. अभिजीत अभिमन्यु आहेरकर याचेविरुध्द् यापुर्वी सन २०१९ पासुन एकुण ०६ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये १) खुनाचा प्रयत्न करणे २)अग्नीशस्त्र बाळगणे ३) प्राणघातक धारदार हत्यारे जवळ बाळगणे ४)गंभीर दुखापत करणे ५)जमाव जमवून दहशत पसरविणे ६) गर्दी मारामारी ७)मालमत्तेचे नुकसान करणे अशा विविध प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

नमुद आरोपीत यांना मा.पोलीस आयुक्त,परिमंडळ-०५,पुणे शहर यांनी सदर टोळीस महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ प्रमाणे हद्दपार आदेश क्र.२२/२०२१,दि.२१/०८/२०२१ अन्वये दोन वर्षे करीता तडीपार केले होते. सदर तडीपार कालावधीमध्ये टोळी प्रमुख व टोळी सदस्यांकडून गुन्हे घडलेले आहेत.तसेच तडीपार कालावधी संपल्यानंतर त्याचे व त्याचे टोळी विरुध्द् लोणी-काळभोर पो. स्टे. वरीलप्रमाणे दखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी ,लोणी काळभोर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.शशिकांत चव्हाण यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परि-५,पुणे शहर,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रदेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन लोणी-काळभोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.६०३/२०२३,भा.दं.वि. क.३०७,३२६,५०४,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधि.१९५१ चे कलम ३७(१)(३),क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ३,७ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ -०५,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,श्रीमती.अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणी-काळभोर पोलीस स्टेशन पुणे,श्री.शशिकांत चव्हाण, तात्कालिन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.दत्तात्रय चव्हाण, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.सुभाष काळे, पोलीस उप-निरीक्षक,अमित गोरे,पोलीस उप-निरीक्षक,हनुमंत तरटे,सर्वेलन्स पथकाचे पोलीस अंमलदार,तेज भोसले,संदीप धनवटे,आशितोष गवळी, मल्हारी ढमढेरे,मंगेश नानापुरे,रोहिणी जगताप यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर भर देवुन शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचे उद्देशाने कठोर पावले उचलण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ८३ वी कारवाई आहे.**